
स्वाधार योजना
अंतर्गत आपले अर्ज Renewal
करत असलेल्या विद्यार्थ्यासाठी
RENEWAL
Renewal अर्ज करण्याची
मुदत वाढवण्यात आली आहे
15 ऑक्टोबर 2026
पर्यत

# सूचना

२०२५-२६ साठी जे विद्यार्थी स्वाधार योजनेसाठी पात्र होते त्यांनी २०२६-२७ साठी स्वाधार योजनेच्या नूतनीकरण अर्ज भरण्यासाठी मुदत वाढ देण्यात आली आहे त्याची **<u>अंतिम तारीख १५/१०/२०२६ पर्यंत</u>** आहे तरी विद्यार्थ्यांनी आपले अर्ज भरून घ्यावे याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच सोबतचे महाराष्ट्र शासन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर. जा.क्र.: ससंइमाबको/ शावगृह/आधार-स्वयंम/२०२६-२७/१८५३, दिनांक: ०२/१०/२०२६ यांचे पत्रानुसार अर्ज सादर करावा.

**SET/स्वाआधार स्कॉलरशिप**
**दि.१०.०३.२०२६**

SHIVAJI UNIVERSITY School of ... Technology ... Kolhapur

Director
School of Engineering & Technology
Shivaji University, Kolhapur

महाराष्ट्र शासन

## सहायक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण,कोल्हापूर.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारे माळ, कोल्हापूर.

E-mail:-adobckolhapur@gmail.com

जा.क्र.ससंइमाबको/शावगृह/आधार-स्वयंम/२०२६-२७/१८५३ दिनांकः- ०२ /१०/२०२६.

**अत्यंत महत्त्वाचे/कालमर्यादा**

**प्रति,**

**१.प्राचार्य,**
**कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व महाविद्यालये,**
**इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व महाविद्यालये,**
जि.कोल्हापूर.

**२.प्राचार्य,**
**तालुक्यात असणारी सर्व महाविद्यालये,**
जि.कोल्हापूर.

**विषय :- शासकीय वसतिगृह,ज्ञानज्योती सावित्रीबाई आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतंर्गत प्रवेश अर्ज करणेसाठी ऑफलाईन सुविधा उपलब्ध करुन दिलेबाबत..**

**संदर्भ** :-१.इतर मागास बहुजन कल्याण विभाग,शासन निर्णय क्र.वगृयो२०२२/प्र.क्र.११/योजना ५ दिनांक:१३ डिसेंबर २०२३

२.इतर मागास बहुजन कल्याण विभाग,शासन निर्णय क्र.स्वयंम २०२३/प्र.क्र.३६८/ योजना दिनांक:२१ जून २०२४.

३.या कार्यालयाचे पत्र क्र.१५८७ दिनांक:१७.०८.२०२६

४.या कार्यालयाचे पत्र क्र.१६६५ दिनांक:०२.०९.२०२६

५.मा.संचालक,इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.४९२४ दि.०१.०९.२०२६

६.मा.अवर सचिव,इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांचे पत्र क्र.११६ दि.१७.०९.२०२६

७. मा.संचालक,इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.५४९६ दि.०१.१०.२०२६

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ ते २ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील इतर मागास प्रवर्ग,विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी योजना खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | योजना | प्रवर्ग | तालुका क्षेत्रातील सर्व महाविद्यालये | कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व महाविद्यालये | लाभ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **तालुका** | **जिल्हा** |
| १. | शासकीय वसतिगृह | OBC,VJNT ,SBC व EWS | लागू नाही | सर्व महाविद्यालये | लागू नाही | मुलां व मुलींना दरमहा भोजनभत्ता-4500,निर्वाहभत्ता-600 तसेच मुलींना स्वच्छता साधने भत्ता-200 |
| २. | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना | OBC, SBC तसेच VJNT ( NT-C वगळून) | सर्व महाविद्यालये | कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश मिळाला नाही ते विद्यार्थी व विद्यार्थीनी | रु.38000 | रु.43000 |
| ३. | पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना | NT-C | सर्व महाविद्यालये | कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश मिळाला नाही ते विद्यार्थी व विद्यार्थीनी | रु.38000 | रु.43000 |

सदर योजनेंचा लाभ घेण्याकरिता सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना Online प्रवेश अर्ज भरण्याकरिता https://hmasnew.mahait.org/ या पोर्टलवर (टॅब) उपलब्ध करून देण्यात आलेला होता.

संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व वर्तमानपत्रामधून शासकीय वसतिगृह, इतर मागास प्रवर्ग,विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना तसेच भटक्या जमाती क प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचे अर्ज भरणेसाठी प्रसिध्दी देण्यात आली होती.

तसेच संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये आपल्या महाविद्यालयात प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना तसेच भटक्या जमाती क प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी अर्ज करणेबाबत सूचना देण्यात आल्या असून अद्याप आपल्या महाविद्यालयातून शासकीय वसतिगृह,आधार व स्वयंम या योजनेंसाठी अर्ज प्राप्त झालेले नाहीत. विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही तर विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते.तरी सदर योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांनी पुनश्चः नुतनीकरणाचे अर्ज भरणेसाठी सुचना देण्यात याव्यात.

त्यानुषंगाने संदर्भ क्र.५ च्या पत्रान्वये आपल्या महाविद्यालयात प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेसाठी अर्ज करणेसाठी दि.१५.०९.२०२६ रोजी पर्यंत मुदत होती.

तथापि संदर्भ क्र.६ च्या पत्रान्वये शासकीय वसतिगृह,आधार व स्वयंम योजनांकरीता ऑनलाईन अर्ज करत असताना येणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे सदर अर्ज दि.३०.०९.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

संदर्भ क्र.७ च्या पत्रान्वये **दि.१०.१०.२०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून सदर योजनेचे अर्ज सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारे माळ, तिसरा मजला कोल्हापूर या कार्यालयास सादर करावेत.**

तरी आपल्या महाविद्यालयातील नोटीस बोर्डवर याबाबतची सुचना देण्यात याव्यात. तसेच सर्व विद्यार्थ्यांना नोटीस व्दारे वर्गात सुचना द्याव्यात तसेच सोशल मिडीयाव्दारे (WhatsApp, SMS) याबाबतची माहिती प्रसारीत करून विद्यार्थ्यांमध्ये प्रचार व प्रसिध्दी करावी. याबाबत आपण व्यक्तीशः लक्ष घालावे, जेणेकरुन इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील एकही पात्र विद्यार्थी या योजनेच्या लाभापासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**सहायक संचालक,**
**इतर मागास बहुजन कल्याण,कोल्हापूर**